# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १२२-२३ दिनांक :- १३/०४/२०२३

## वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणाऱ्या वेश्यादलालास अटक करून पीडीत महिलेची सुटका अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांची कारवाई.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिति मिळाली की, वेश्यादलाल नामे १) राजू उर्फ मोजाम अली शेख, वय ३८ वर्षे, रा. रेहमतनगर, प्रिन्स पार्क, नालासोपारा पुर्व व २) नरेश रा. दहिसर हे पिडीत महिलानां पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळया ग्राहकांना वेगवेगळया ठिकाणी बोलावुन त्याचेकडुन वेश्यागमनाकरीता महिला पुरविल्याच्या बदल्यात मोबदला स्विकारतात व वर नमुद दलाल हे दिनांक १२/०४/२०२३ रोजी माणिकपुर पोलीस ठाण्याचे हद्दीत पांचाळ नगर वसई (प.) येथे वेश्यागमनाकरीता महिलांना पुरविणार आहेत.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपाराचे पो. नि. श्री. संतोष चौधरी यांनी सदरची माहिती वरिष्ठांना देवुन कायदेशीर बाबींची पर्तता करुन पोलीस स्टाफ, बोगस गिहाईक व दोन पंचासह वर नमुद ठिकाणी सापळा कारवाई केली असता अरोपीत नामे राजू उर्फ मोजाम अली शेख, वय ३८ वर्षे, रा. रेहमतनगर नालासोपारा पुर्व यास ताब्यात घेण्यात आले व एका पिडीत महिलेची वेश्या व्यवसायापासुन सुटका करण्यात आली. सदर कारवाईत अटक अरोपीत यांचेकडून गुन्हयात वापरण्यात आलेली ॲक्टिवा गाडीसह एकुण ६६,३५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून सदरबाबत सरकारतर्फे पो.हवा. श्री. रोशन किणी यांनी अटक व पाहिजे अरोपीताविरुध्द फिर्याद दिल्याने माणिकपुर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. I १३७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७० (१) (२), ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपाराचे पो.नि. श्री. संतोष चौधरी, पो.उप.नि. निकम, पो.हवा. पवार, पद्मने, किणी, राउत, शेटये, म.पो.हवा. तिवले, चालक पो.हवा. पागी तसेच म.पो.अंम.भोर नेम. भरोसा सेल वसई यांनी केली आहे.

----ooooo----